# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २८० - २३ दिनांक : - २३/०८/२०२३

## रिक्षामधुन प्रवास करत असतांना गहाळ झालेली रक्कम रु ५०,०००/- परत मिळवुण देण्यात माणिकपुर पोलीसांना यश

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये इसम नामे श्री. उदय नरशी नागडा, वय ४० वर्षे, रा. रुम नं. बी/१०८, ओम होमा रेसिडेन्सी, भाईंदर पश्चिम, जि. ठाणे हे दिनांक २२/०८/२०२३ रोजी १५.३० वा. मानसरोवर स्विट, अंबाडी रोड, ते वालीव नाका येथे जाण्यासाठी मानसरोवर स्विट, अंबाडी रोड, वसई पश्चिम, येथुन रिक्षातुन वालीन नाका प्रवासादरम्स्यान त्यांचे खिशातील रु ५०,०००/- रोख रक्कम गहाळ झाल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी माणिकपुर पोलीस ठाणे येथे तात्काळ हजर होवुन झालेल्या घटनेबाबत माहिती दिली होती.

सदर घटनेच्या अनुषंगाने माणिकपुर पोलीस ठाणे नेमणुकीतील दिवसपाळी बिट मार्शल कर्तव्यावर नेमलेले पोलीस नाईक ०७०८१/ कृष्णा साबळे यांनी मानसरोवर स्विट येथील सि.सि.टी.व्ही कॅमेरे तपासुन सदर इसमाने प्रवास केलेल्या ऑटो रिक्षाचा क्रमांक प्राप्त करुन रिक्षा चालकाचा शोध घेवुन त्याचेकडे तक्रारदार यांचे गहाळ झालेल्या रकमेबाबत बारकाईने व कौशल्याने विचारपुस करुन तक्रारदार यांचे गहाळ झालेले रक्कम रु ५०,०००/- हस्तगत करुन तक्रारदार यांना परत केले.

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौघुले-श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक कृष्णा साबळे यांनी यशस्विरीत्या पार पाडली आहे.